Exh.1/C

दै.र.नं.   /२०२६

ता.   /०४/२०२६                                    क्रि.अर्ज नं. 54   /२०२६

**कागल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो,**

**यांचे न्यायालयात....**

**संदीप अण्णाप्पा ठिकणे**

व.व.४३, धंदा : व्यवसाय,

रा.चिंचवाड ता.करवीर,जि.कोल्हापूर                **अर्जदार**

**विरुद्ध**

**१.महाराष्ट्र सरकार तर्फे**

राज्य उत्पादन शुल्क विभाग,कोल्हापूर

व कागल पोलीस ठाणे

**२. मयुरी रोडलाईन्स तर्फे**

**अशोक पायगोंडा पाटील**

व.व.५६, धंदा : व्यवसाय,

रा. चिंचवाड ता.करवीर,जि.कोल्हापूर                **वि.प**

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३/४९७ प्रमाणे मुद्देमाल मिळविणेसाठी अर्ज.**

**निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,कागल**

**गु.र.नं. ०८ / २०२६**

**गुन्हा-**

**महारष्ट्र मध्य निषेध अधिनियम १९४९ कलम ६५ (अ)(ब)(ड)(इ),८१,८३,९० व १०८भारतीय न्याय संहिता कलम १२३,३४१,३४२,३४५(१) व ट्रेड मार्क्स कायदा १९९९ चे कलम १०३ व १०४ प्रमाणे**

Order

-------

Call Say of IO and APP

**यातील अर्जदार तर्फे विनंती अर्ज की,**

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

१) <u>मुद्देमालाचा तपशील –</u>

| अ.क्र. | तपशिल | किंमत |
|---|---|---|
| अ) | VIVO Y 400 8/256 5G OLIVE GREEN<br>IMEI NUMBER-८६९५५००७६८०७२५४ | 23,999/- |
| ब) | जियो या कंपनीचे मोबाईल सीम ९३७२५५२७२७ | ०००/- |
| | TOTALE AMOUNT | 23,999/- |

वर नमुद मुद्देमाल हा यातील अर्जदार यांचे मालकीचा असून प्रस्तुत अर्जाचे कारणास्तव सदर मुद्देमालास यापुढे **"मुद्देमाल क्र.१ अ) व मुद्देमाल क्र.१ ब)"** असे संबोधनेत येत आहे.

२) यातील अर्जदार हे वर नमूद पत्त्यावर कायमपणे राहणेस आहेत.

३) यातील अर्जदार क्र. १ व वि.प क्र.२ यांचे दरम्यान मामा व भाचे असे नाते संबंध आहे. यातील वि.प क्र.२ यांनी त्यांचे भाच्यास म्हणजेच अर्जदार याला मोबाईल फोन (मुद्देमाल क्र.१अ) भेट स्वरुपात दिला होता. त्यामुळे सदरच्या फोन (मुद्देमाल क्र.१अ) चे बिल केवळ वि.प क्र .२ यांचे नावे आहे. मात्र, त्याची पूर्ण मालकी व ताबा यातील अर्जदार यांचेकडेच असून त्याचा पूर्ण वापर हेच करत होते.

४) तसेच मुद्देमाल क्र.१अ) मोबाईल फोन मध्ये वापरात असलेले जिओ या कंपनीचे सीम (मुद्देमाल क्र.ब) अर्जदार यांचे मालकीचे असून त्याचा वापर ते त्यांचे दैनंदिन,आर्थिक व व्यावसायिक कारणाकरिता एकीत असतात.

५) अर्जदार यांच्या मालकीचा मुद्देमाल क्र.१ अ) व १ब) हा राज्य उत्पादन शुल्क विभाग, कोल्हापूर व कागल पोलीस ठाणे यांनी गुन्हा रजिस्टर नं.०८/२०२६ चे गुन्ह्याचे कामी जप्त केलेला असुन, सदर मुद्देमाल हा राज्य उत्पादन शुल्क विभाग कोल्हापूर यांचेकडे जप्त अवस्थेत आहे. सदर जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांच्याच मालकीचा असून सदर मोबाईल फोन त्यांचे दैनंदिन वापरातील आहे.

६) वर वर्णन केलेला जप्त मुद्देमाल क्र.१ अ) हा अर्जदार यांच्या मालकीचा असून त्याचे बिल वि.प क्र.२ यांचे नावे असल्याने त्यांना या कामी वि.प क्र २ म्हणून सामील केलेले आहे.

**७) <u>सदर जप्त मुद्देमाल क्र.१ अ) व १ ब) हा अर्जदार यांना परत मिळावा, यासी कारणे खालीलप्रमाणे –</u>**

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

अ) सदरचा जप्त मुद्देमाल पोलीसांकडे राहिल्यास सदर मुद्देमालाचे खराब होण्याची दाट शक्यता आहे.

आ) सदर जप्त मुद्देमाल यातील अर्जदार यांना त्यांचे दैनंदिन,आर्थिक व व्यावसायिक वापरासाठी आवश्यक असल्याने व व त्यामध्ये त्यांचे सर्व व्यावसायिक फोन नंबर तथा माहिती असलेने अर्जदार यांना सदर मुद्देमाल त्यांचे ताबेत न मिळालेस त्यांचे कधीही भरून न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे.

इ) सदर जप्त मुद्देमाल अर्जदार यांना बॉण्डवर ताबेत दिल्यास त्यामध्ये अर्जदार कोणत्याही प्रकारचा बदल,फेरफार,करणार नाहीत तसेच सदर मुद्देमाल कोणत्याही प्रकारे तबदील करणार नाहीत.

ई) सदर जप्त मुद्देमाल अर्जदार यांना बॉण्डवर ताबेत दिल्यास मे.कोर्ट आदेश करील त्यावेळी अर्जदार हे सदर मुद्देमाल मे.कोर्टात हजर करण्यास तयार आहेत.

उ) सदर जप्त मुद्देमाल बॉण्डवर ताबेत दिल्यास अर्जदार हे मे.कोर्टाच्या अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहेत.

ऊ) सदर जप्त मुद्देमालाच्या मालकी हक्काच्या कागदोपत्री अर्जदार यांच्या नावाची नोंद आहे.

ऋ) सदर जप्त मुद्देमालाच्या मालकीविषयी त्यांचे बिलाची प्रत सादर केली आहे.

ऌ) सदर जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये राहिल्यास मुद्देमाल खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

८) <u>**सबब अर्जदार यांची विनंती की,**</u>

अ) अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा.

आ) अर्जात नमूद **"मुद्देमाल क्र.१ अ) व मुद्देमाल क्र.१ ब)"** अर्जदार यांना बॉण्डवर ताबेत देण्याचा वि.प. यांना हुकूम द्यावा.

इ) जरुर तर अर्ज दुरुस्तीस परवानगी मिळावी.

**कागल**

**ता. ०८/०४/२०२६**

अर्जदार

[signature]

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

<u>ॲफीडेव्हीट</u>

मी यातील अर्जदार संदीप अण्णाप्पा ठिकणे व.व.४३, धंदा : शेती, रा.चिंचवाड,ता.करवीर,जि.कोल्हापूर देवाचे शपथेवर कथन करतो कि, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफीडेव्हीट आज मु// कागल /कोल्हापूर

ता. /०४/२०२६

अर्जदार

<u>प्रतिज्ञा</u>

मी उपरोक्त ॲफीडेव्हीट करणार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो कि, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु// कागल /कोल्हापूर

I know the Deponent.

Adv. P.M. Chaudhari

ता. ०८/०४/२०२६

अर्जदार

Solemnly Affirmed before me by
Shri Sandeep Annappa Thikane
Age 43 of Chinchwad, Tal. Karveer who is
identified by Shri Adv. P.M. Chaudhari
.............whom I know personally
Dated :- 8/4/26

Assistant Superintendent

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.05.02 15:15:33 +0530